स्थायी समिती
दाखल विषय – दि. २५/१०/२०१७

विषय क्रमांक :– ११३२ त्वर्य

सन 2017–18 या शैक्षणिक वर्षात मनपा शाळांतील विद्यार्थ्यांसाठी ई लर्निंग प्रणाली, व्हर्चुअल क्लासरूम, डिजीटल क्लासरूम व ॲडाप्टीव्ह लर्निंग मॅनेजनमेंट सिस्टीम योजना राबविणेकरीता मर्यादित निविदा (हार्डवेअर पुरवठा, यंत्रणा उभारणे, अंमलबजावणी, 3 वर्षे देखभाल करणे, सादरीकरण, मूल्यमापन इ. अन्य बाबींबरोबरच इंटरनेट सुविधा, अभ्यासक्रमावर आधारित 2D/3D व्हिडीओ निर्मिती आणि प्रसारण करणे अशा प्रकारची) आर.एफ.पी. मर्यादित निविदा तत्कालीन शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा यांचे मार्फत पुणे मनपा वेबसाईट https://pmctenders.abcprocure.com येथे दि. 10/03/2017 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर निविदेतील सहभागी तीन निविदादारांमधील बी.एस.एन.एल, पुणे यांचे टेक्नोकमर्शिअल स्कोअर सर्वाधिक असल्याने, आज अखेर बी.एस.एन.एल.,पुणे यांनी मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या तक्त्याप्रमाणे दर निगोसिएशन करून सादर केले असून मनपा शाळांमध्ये ई लर्निंग प्रणालीची कार्यवाही सुरू करण्यासाठी कालापव्यय होवू नये, म्हणून मा.मनपा मुख्य सभेची मान्यता मिळेल या भरवशावर कार्यवाही करण्यासाठी खालील अ. क्र 1 ते 8 बाबींस मान्यता दयावी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शिक्षण विभाग/४६० दि.१६/१०/२०१७ चे पत्र.

1. बी.एस.एन.एल, पुणे यांचे मार्फत ई लर्निंग प्रोजेक्ट राबविणे करीता एकूण र.रू.20,99,97,597.00 (अक्षरी रूपये वीस कोटी नव्व्याण्णव लाख सत्त्याण्णव हजार पाचशे सत्त्याण्णव फक्त) इतका खर्चाचा सुधारित प्रस्तावास मान्यता देणेस

2. प्रथम वर्षी सन 2017–18 करीता निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी र.रू 10,63,59,422/- (अक्षरी र.रू. दहा कोटी त्रेसष्ठ लाख एकोणसाठ हजार चारशे बावीस फक्त) येणारा खर्च पुणे महानगरपालिकेच्या मान्य अंदाजपत्रकीय मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या तक्त्यातील अर्थशीर्षकामधून करणेस

3. उर्वरित सन 2018–19, 2019–20, 2020–21 या 3 वर्षांसाठी एकूण रक्कम रूपये10,36,38,175/- (अक्षरी र.रू. दहा कोटी छत्तीस लाख अडोतीस हजार एकशे पंचाहत्तर फक्त) खर्च पुणे महानगरपालिकेच्या मान्य अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकामधून करणेस

4. रोटरी डिस्ट्रीक्ट लिटरसी कमिटी, पुणे व रायगड यांच्या र.रू. एक कोटीची रक्कम पुणे मनपाच्या कोष कार्यालयात जमा झाल्यानंतर पुणे मनपा मार्फत बी.एस.एन.एल, पुणे यांना आदा करणेस.

5. बी.एस.एन.एल, पुणे यांचे मार्फत ई लर्निंग प्रोजेक्ट राबविणे करीता एकूण र.रू.20,99,97,597/- एवढा खर्च अपेक्षित असून, पैकी 1 कोटी रूपये खर्च रोटरी डिस्ट्रीक्ट लिटरसी कमिटी, पुणे व रायगड देणार असल्याने, उर्वरित र.रू. 19,99,97,597/- (अक्षरी रूपये एकोणीस कोटी नव्व्याण्णव लाख सत्त्याण्णव हजार पाचशे सत्त्याण्णव फक्त) खर्च पुणे महानगरपालिकेच्या मान्य अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकामधून करणेस.

6. बी.एस.एन.एल.मार्फत पुरविण्यात येणा–या हार्डवेअर, सॉफटवेअर तसेच करण्यात येणारी देखभाल दुरूस्तीविषयक संपूर्ण बाबी (Installation, Implementation, Operation, Maintainance) तसेच सांख्यिकी विभाग, पुणे मनपा यांचे अधिनस्त टेक्निकल समिती नेमून त्यांचेमार्फत बी.एस.एन.एल कडून प्रकल्पाची संपूर्ण कार्यवाही करणेबाबतची दक्षता घेणेस

7. बी.एस.एन.एल. यांचेकडून शैक्षणिक सॉफटवेअर, व्हिडीओ, निर्मितीविषयक तसेच संपूर्ण शाळांमधून समन्वय साधून शैक्षणिक उपक्रमाची कार्यवाही शिक्षण विभाग (प्राथमिक)मार्फत करणेस.

8. उपरोक्त 1 ते 7 बाबींस बी.एस.एन.एल, पुणे यांना सन 2017–18 या शैक्षणिक वर्षात मनपा शाळांतील विद्यार्थ्यांसाठी ई लर्निंग प्रणाली, व्हर्चुअल क्लासरूम, डिजीटल क्लासरूम व ॲडाप्टीव्ह लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम योजना राबविणेकरीता कार्यादेश व करारनामा करणेस

विषय क्रमांक :– ११३३ त्वर्य

पर्णकुटी ते आपले घर (नगर रस्ता) बी.आर.टी.एस.मार्गीकेची देखभाल दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे (सिव्हील कामे) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्यू सिध्दी इन्फ्रा प्रोजेक्टस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,७८,०७४=८० पेक्षा ३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,८४,६५२=३६ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४६३ दि. १८/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :– ११३४ त्वर्य

औंध व घोलेरोड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सेवावाहिन्यांनी खोदलेल्या ठिकाणी रिईन्स्टेटमेंटची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जय शिव शंकर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,५८,५७८=२४ पेक्षा २५.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,५१,००८=२३ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा न करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४६४ दि. १८/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :– ११३५ त्वर्य

पुणे महानगरपालिकाचे वैद्यकिय सहाय्य योजनेचे सेवक व सेवानिवृत्त सेवकांची रिएम्बर्समेंटची आर्थिक तरतूद संपुष्टात आल्याने बिले आदा करणेसाठी र.रु. २ कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४७२ दि.१८/१०/२०१७ चे पत्र.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, ७ रूग्णालये प्रस्तुतीगृहे औषधालये, RE17F154, ६. पुणे शहरातील झोपडपट्टीत राहणारे/पिवळे रेशनकार्ड धारक/वार्षीक उत्पन्न १ लाखापर्यंतच्या नागरीकांसाठी पुणे मनपातर्फे आरोग्य सहाय्य योजना	२ कोटी	----
नविन सुचवलेले काम आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, ७ क रूग्णालये प्र.गृहे, RE17F153D, क–सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना औषधे, उपकरणे व साहित्य वगैरे, ब–२ मनपा सेवकांसाठी रिएम्बर्समेंट	----	२ कोटी

विषय क्रमांक :– ११३६ त्वर्य

येरवडा क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सेवावाहिन्यांनी खोदलेल्या ठिकाणी रिईन्स्टेटमेंटची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,५८,५७८=२४ पेक्षा ३०.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,०१,२९४=७२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४७७ दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :– ११३७ त्वर्य

नगरसचिव कार्यालयाकडील सेवक श्री. दयानंद सदाशिव जाधव, हुद्दा नाईक यांनी प्रकृतीनुसार/ वयोमानानुसार काम होत नसल्याचे कारणास्तव मनपा सेवेतून ऐच्छिक सेवानिवृत्ती मिळावी म्हणून दि. १२/१०/२०१७ रोजी विनंती अर्ज केलेला असून सदर सेवकाचा ऐच्छिक सेवानिवृतीची विनंती मनपा सेवाविनियम ६६(जे) मधील २० वर्षे सेवा पूर्णतेची/वयाबाबतची, तरतूद विचारात घेऊन श्री. दयानंद सदाशिव जाधव, हुद्दा नाईक यांना त्यांचे स्वेच्छेनुसार व त्यांचे मागणीनुसार दि.३१/१/२०१८ रोजी कार्यालयीन वेळेनंतर मनपा सेवेतून(ऐच्छिक सेवानिवृती) सेवामुक्त करण्यास व सेवानिवृत्तीमुळे नियमाप्रमाणे पेन्शन, ग्रॅज्युटी इ. मिळणारे सर्व फायदे त्यांना अदा करणेस तसेच त्यांचेकडून मनपाची येणे बाकी असल्यास वा निघाल्यास ती विनाविलंब वसूल करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ५३६८ दि. २४/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :- ११३८ त्वर्य

पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन ट्रस्ट, पुणे यांनी पुणे महानगरपालिकेच्या सहकाऱ्याने ३२ वी पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन स्पर्धा पुणे शहरात आयोजित केलेली आहे . सदर स्पर्धेतील यशस्वी खेळांडूना रोख पारितोषिके देण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या सन २०१७ - २०१८ च्या अंदाजपत्रकात रक्कम रूपये ३५,००,०००/- (र.रू पस्तीस लाख फक्त) ची तरतूद करण्यात आलेली आहे . सदर स्पर्धा रविवार, दि. ३ डिसेंबर २०१७ रोजी संपन्न होणार आहे.

सदर स्पर्धेतील विविध गटांतील यशस्वी खेळांडूना रोख पारितोषिके पुणे महानगरपालिकेतर्फे देण्यात यावी, अशी विनंती पुणे इंटरनॅशनल मॅरथॉन ट्रस्ट, पुणे यांनी संदर्भ क्रं. ३ चे पत्राने मा. महापौर यांना केलेली आहे. या पत्रावर पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेची पारितोषिके पुरस्कृत करणेकरिता खात्यामार्फत आवश्यक ती व्यवस्था करणेत यावी, असे आदेश मा. महापौर यांनी त्यांचे संदर्भांकित क्र. ४ चे पत्रान्वये केले आहेत.

महाराष्ट्र शासनाकडील संदर्भांकित पत्र क्र. १ व २ मधील धोरणानुसार, महानगरपालिका व नगरपालिकेस खेळ व संघ दत्तक घेणे. विविध खेळांच्या खेळाडूंना बक्षिसे देणे तसेच क्रीडा विषयक बाबींवर ५ टक्के खर्च करता येतो.

तरी ३२ वी पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या स्पर्धकांना पुणे महानगरपालिकेतर्फे मान्य तरतूदीमधून मा.सरचिटणीस, पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन ट्रस्ट, पुणे यांचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे र.रू. ३४,९३,०००/- (अक्षरी - चौतीस लाख त्र्याण्णव हजार रूपये फक्त) रोख पारितोषिके धनादेशाव्दारे देण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ५४१५ दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

१) संदर्भ क्रं. ४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे धनादेशाने अथवा आर.टी.जी.एस. मार्फत रोख पारितोषिके यशस्वी स्पर्धकांना मा. उप आयुक्त (क्रिडा) व मा. मुख्य लेखापाल यांच्यामार्फत आदा करण्यास,

२) पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन स्पर्धेचा खर्च खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकण्यास,

सन २०१७ - २०१८ चे अंदाजपत्रक, १. मुख्य देखरेख वसुली वगैरे

क. महानगरपालिका व स्थायी समिती, नगरसचिव यांचे कार्यालय

पान नं.१४६, यादी क्र. आर-३, सत्कार, अभिनंदन, पुरस्कार, बक्षिसे यासारखे कार्यक्रम करणे

(RE11A276/R3-7) पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेसाठी पारितोषिके देणे.

मान्य तरतूद रक्कम रूपये ३५,००,०००/- (र.रू पस्तीस लाख फक्त)

विषय क्रमांक :- ११३९ त्वर्य

मा.बाळा ओसवाल यांचे दि. १८/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३७ क येथे ई-लर्निंग स्कुल बांधणेसाठी र.रू.४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक,		
१) ७.आरोग्य विभाग, पान क्र. ९८, अ.क्र. १९,शहरामध्ये नव्याने प्रसुतिगृह/विविध सोयीसुविधा असलेले दवाखाने बांधणे. (यादी क्र. एसजे ६), पान क्र.२२६, अ.क्र.६१, प्रभाग क्र. ३७ क मध्ये अप्पर इंदिरानगर व्ही.आय.टी. कॉलेजशेजारी शांताई दवाखान्यात विविध विकासाची कामे करणे	१० लाख	---
१०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०४, अ.क्र. ३५, शहरामध्ये भूमिगत केबल टाकणे, (यादी क्र. एसबी ७),		
२)पान क्र.२११, अ.क्र.११५, प्रभाग क्र. ३७क मधील २७६ येथे भुमीगत केबल टाकणे	१० लाख	---
३)पान क्र.२११, अ.क्र.११६, प्रभाग क्र. ३७ क मधील अप्पर इंदिरानगर येथे भुमिगत केबल टाकणे	१० लाख	---
४) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरणाने विकसित करणे, (यादी क्र. एसए २), पान क्र.१६५, अ.क्र.५०४, प्रभाग क्र. ३७ क मध्ये विद्यासागर सिध्दीनगर महेश रस्ता डांबरीकरण करणे.	१० लाख	---
<u>नवीन सुचविलेले काम-</u>		
प्रभाग क्र.३७ क येथे ई-लर्निंग स्कुल बांधणे	---	४० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- ११४० त्वर्य

मा.सौ.हमिदा सुंडके यांचे दि. २३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.२७ अ मध्ये सवेरा गार्डन विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक १)७.आरोग्य विभाग, पान क्र. ९८, अ.क्र. १९, शहरामध्ये नव्याने प्रसुतिगृह/विविध सोयीसुविधा असलेले दवाखाने बांधणे.(यादी क्र. एसजे ६), पान क्र.२२५, अ.क्र.४३, प्रभाग क्र.२७ क मध्ये मीनाताई ठाकरे दवाखान्यामध्ये विविध विकासकामे करणे. २) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३६, अ.क्र.३५४, प्रभाग क्र.२७ क मध्ये मनपा नुरानी कब्रस्तान मध्ये प्रार्थनास्थळ बनविणे **<u>नवीन सुचविलेले काम-</u>** प्रभाग क्र.२७ क मध्ये सवेरा गार्डन मध्ये विविध विकासकामे करणे	१० लाख १० लाख **---**	--- --- २० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- ११४१ त्वर्य

मा.सुशिल मेंगडे यांचे दि. २३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३१ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.८० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, ४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३६, अ.क्र. १, निरनिराळ्या झोपडपट्टीमध्ये विविध विकासाची कामे करणे (यादी क्र.एसजी १), पान क्र. २५९, अ.क्र. २६, कामना वसाहत, कर्वेनगर या दलित वस्ती मध्ये विविध विकास काम करणे. **<u>नवीन सुचविलेली कामे</u>** १)प्रभाग क्र.३१ मधील कामना वसाहत बौध्द मंदिर परिसरात रस्ते ट्रिमिक्स काँक्रिटीरण करणे २) प्रभाग क्र.३१ मधील कामना वसाहत, बौध्द मंदिर परिसरात विद्युत विषयक कामे करणे व हायमास्ट बसविणे. ३) प्रभाग क्र.३१ मधील कामना वसाहत, बौध्द मंदिर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे. ४) प्रभाग क्र.३१, मधील कामना वसाहत, बौध्द मंदिर परिसरात लोखंडी बेंचेस बसविणे. ५) प्रभाग क्र.३१, मधील कामना वसाहत, कर्वेनगर संकलनसाठी प्लॅस्टीक बकेट पुरविणे.	८० लाख **---** **---** **---** **---** **---**	--- २५ लाख २० लाख २५ लाख ०५ लाख ०५ लाख

विषय क्रमांक :- ११४२ त्वर्य

मा.सौ.शीतल शिंदे यांचे दि. २४/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.५ ब मध्ये उज्वल गार्डन परिसरामध्ये नाला व ड्रेनेज लाईन स्पायडर मशीन व जेटींग मशीनच्या सहाय्याने साफसफाई करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र.२४, अ.क्र. २, शहरामध्ये नाला चॅनलायझेशन करणे/नाल्याला सिमाभिंत बांधणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र. एसडी ३), पान क्र.६९, अ.क्र.१०, प्रभाग क्र. ५ ब मध्ये उज्वल गार्डन येथे उर्वरित नाला विकसित करणे. **<u>नवीन सुचविलेले काम</u>** प्रभाग क्र.५ ब मध्ये उज्वल गार्डन परिसरामध्ये नाला व ड्रेनेज लाईन स्पायडर मशीन व जेटींग मशीनच्या सहाय्याने साफसफाई करणे	१० लाख **---**	--- १० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- ११४३ त्वर्य

मा.सौ.वासंती जाधव यांचे दि. २४/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १२ क मधील सुतार दवाखान्याशेजारील श्रीमती सुमनताई माथवड भाजी मंडई विकसित करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र. २३२, अ.क्र.१७०, प्रभाग क्र. १२ क मध्ये अलकापुरी सोसायटी कै.रमेश वांजळे विरंगुळा केंद्राचे दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करणे व सचिन तेंडूलकर क्रिडा केंद्र येथील मजला वाढविणे	५० लाख	---
नविन सुचविलेले काम प्रभाग क्र. १२ क मधील सुतार दवाखान्याशेजारील श्रीमती सुमनताई माथवड भाजी मंडई विकसित करणे	---	५० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- ११४४ त्वर्य

मा.सौ.आरती कोंढरे यांचे दि. २४/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१८ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.च, स्ट्रॉम वॉटर ड्रेन प्रकल्प, पान क्र. १०६, अ.क्र. १, पुणे शहरातील पावसाळी पाण्याच्या व्यवस्थापनासाठी नाला सुधारणा कामे, कल्व्हर्टस व पावसाळी लाईन टाकणे, (यादी क्र.एसएफ १), पान क्र. २१७, अ.क्र.५६, प्रभाग क्र. १८ ब जैन मंदिर ते रामोशी गेटपर्यंत पावसाळी लाईन दुरुस्ती करणे किंवा नविन टाकणे.	१० लाख	---
<u>नवीन सुचविलेली कामे</u>		
१)प्रभाग क्र.१८ ब मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध ठिकाणी विरंगुळा केंद्र बांधणे	---	५ लाख
२)प्रभाग क्र.१८ ब मध्ये विविध ठिकाणी रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे	---	५ लाख

विषय क्रमांक :- ११४५ त्वर्य

मा.सौ.स्वप्नाली सायकर यांचे दि. २४/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.९ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते काँक्रीटीकरण करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, १)१७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४४, अ.क्र.४३, प्रभाग क्र. ९ अ क्रिडांगण विकसित करणे.	१० लाख	---
२) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३१, अ.क्र.१२३, प्रभाग क्र. ९ अ सोमेश्वर मंदिर ते महाबळेश्वर हॉटेल रामनदीकडील विकास कामे करणे.	१० लाख	---
<u>नवीन सुचविलेले काम</u> प्रभाग क्र.९ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते काँक्रीटीकरण करणे	---	२० लाख

विषय क्रमांक :- ११४६ त्वर्य

मा.सौ.किरण जठार यांचे दि. २४/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१ अ मध्ये राडा-रोडा उचलणे व विविध ठिकाणी रस्ते काँक्रिटीकरण करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. ५, शहरात विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एसए १०), पान क्र.१७३, अ.क्र.२, प्रभाग क्र. १ अ (कळस धानोरी) मधील राडारोडा उचलणे	२० लाख	---
<u>नवीन सुचविलेले काम</u>		
प्रभाग क्र.१ अ मध्ये राडा-रोडा उचलणे व विविध ठिकाणी रस्ते काँक्रिटीकरण करणे	---	२० लाख

विषय क्रमांक :- ११४७ त्वर्य

मा. प्रा.सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१४ क मध्ये स्पायडर मशिनच्या सहाय्याने नाले साफसफई करणे व तद्नुषंगिक कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, खास निधीतून करावयाची योजनांतर्गत कामे, ७. यंत्रसामुग्री घसारा निधीतून विकत घ्यावयाची सामुग्री, पान क्र. १४४, यंत्रसामुग्री घसारा निधीतून विकत घ्यावयाची सामुग्री, (यादी क्र.एसवाय १), पान क्र. २६६, अ.क्र. १५, प्रभाग क्र. १४क मधील विविध कामांकरीता चॅम्पीयन मशिन व जेटींग मशिन खरेदी करणे	१० लाख	---
<u>नवीन सुचविलेले काम</u>		
प्रभाग क्र.१४ क मध्ये स्पायडर मशिनच्या सहाय्याने नाले साफसफई करणे व तद्नुषंगिक कामे करणे	---	१० लाख

विषय क्रमांक :- ११४८ त्वर्य

मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१४ क मध्ये मॉर्डन कॉलेज रोडला ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र.एसजे २), पान क्र. २२१, अ.क्र.५७, प्रभाग क्र. १४क मधील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक संकुलात विविध विकास कामे करणे.	२० लाख	---
<u>नवीन सुचविलेले काम</u>		
प्रभाग क्र.१४ क मध्ये मॉर्डन कॉलेज रोडला ड्रेनेज लाईन टाकणे	---	२० लाख

विषय क्रमांक :- ११४९ त्वर्य

मा.योगेश समेळ यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे, (यादी क्र. एसडी २), पान क्र.६९, अ.क्र.८९८, प्रभाग क्र. १६ ड सोमवार-रास्ता पेठेत विविध गल्ली बोळातील ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीट करणे व फरशी बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे.	१५ लाख	---
<u>नवीन सुचविलेली कामे</u>		
१)मोटार वाहन विभागामार्फत कोंढवा स्मशानभूमी ते कौसरबाग पर्यंतचा नाला स्पायडर मशीनच्या सहाय्याने साफसफाई करणे व तद्नुषंगिक कामे करणे	---	१० लाख
२)मोटार वाहन विभागामार्फत वेलकम हॉल, कोंढवा ते कोंढवा स्मशानभूमी पर्यंतचा नाला स्पायडर मशीनच्या सहाय्याने साफसफाई करणे व तद्नुषंगिक कामे करणे	---	५ लाख

विषय क्रमांक :– ११५० त्वर्य

मा.श्रीमती लता राजगुरु व मा.अविनाश बागवे यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.२० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक, १)क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, (यादी क्र. एसपी २), पान क्र.३७, अनु क्र.३०० प्रभाग क्र.२० क, भवानी पेठ पोलिस वसाहत येथे पाण्याची अंडरग्राऊंड टाकी बांधणे व पंप हाऊस बांधणे. २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र.एसजे २),	१० लाख	---
२)पान क्र.२२२, अनु क्र.८९ प्रभाग क्र.२० क, मध्ये मनपा शाळा व दवाखाने स्थापत्य विषयक कामे करणे.	१० लाख	---
७ आरोग्य विभाग, पान क्र.९८, अ.क्र.७, शहरातील विविध स्मशानभूमी/दफनभूमी साठी विविध विकास कामे करणे.(यादी क्र.एस.जे.१२)		
३) पान क्र.२२७, अनु क्र.३५ प्रभाग क्र.२० क, मध्ये संगमघाट येथे दशक्रिया विधी शेडची दुरूस्ती व इतर तद्नुषंगिक कामे करणे.	१० लाख	---
<u>नवीन सुचविलेली कामे</u>		
१)प्रभाग क्र.२० क, मध्ये विविध ठिकाणी व राजेवाडी परिसर, ताडीवाला रोड, नायडू हॉस्पिटल परिसरात विद्युत विषयक कामे करणे.	---	१० लाख
२) प्रभाग क्र.२० क, मध्ये प्रकाश व्यवस्था व विद्युत विषयक कामे करणे.	---	१० लाख
३) प्रभाग क्र.२० क, मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे.	---	१० लाख

विषय क्रमांक :– ११५१ त्वर्य

मा.सचिन दोडके यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३२ ड मध्ये भवन विभागामार्फत विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक, १)७. आरोग्य विभाग, पान क्र. ९८, अ.क्र. ७, शहरातील विविध स्मशानभूमी/दफनभूमी साठी विविध विकासकामे करणे (यादी क्र. एसजे १२), पान क्र.२२७ , अ.क्र.५४, प्रभाग क्र. ३२ ड वारजे स्मशानभुमी अद्ययावत करणे.	१० लाख	---
२) ७ आरोग्य विभाग पान क्र.९८, अ.क्र.१९, शहरामध्ये नव्याने प्रसुतीगृह/विविध सोयीसुविधा असलेले दवाखाने बांधणे (यादी क्र.एस.जे.६) पान क्र.२२५, अ.क्र.५१, प्रभाग क्र. ३२ ड, वारजे येथे राजमाता जिजाऊ मल्टी स्पेशिलिटी हॉस्पिटल उभारणे.	२० लाख	---
<u>नवीन सुचविलेले काम–</u>		
प्रभाग क्र.३२ ड मध्ये भवन विभागामार्फत विविध विकास कामे करणे	---	३० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :– ११५२ त्वर्य

मा.प्रमोद भानगिरे व मा.सुनिल कांबळे यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

पुणे मनपातील सुरक्षा रक्षक मदतनीस पुरविणेकामी ९०० सुरक्षा रक्षकांसाठी स्थायी समिती ठराव क्र. ७९० दि.१८/९/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

माहे ऑक्टोंबर २०१७ मध्ये यापुर्वी कार्यरत असणारे सुमारे १८०० सुरक्षा रक्षक मदतनीसांची सेवा तशीच पुढे ठेवणेत आलेली आहे.

सबब सदरचे ऑक्टोंबर २०१७ मध्ये कार्यरत असणाऱ्या सुरक्षा रक्षकांची सेवा स्थायी समिती ठराव क्र. ७९० दि.१८/९/२०१७ चे ठेकेदार मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडून घेणेस व त्यापोटी त्यांचे दरानुसार त्यांना वाढीव संख्येस (९०० व्यतिरिक्त) रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ११५३ त्वर्य

मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

मनपा प्रशासनाकडून डीएसआर दरपत्रक बनविण्यास झालेला विलंब ,जीएसटी आकारणी व अन्य कारणांमुळे चालू आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणावर विकास कामे प्रलंबित राहून अंदाजपत्रकिय तरतूद खर्ची पडली नाही. त्यामुळे प्रभागांमधील अनेक विकास कामे रखडलेली आहेत. या सर्व विकास कामांची जबाबदारी सध्या कार्यरत असलेल्या अभियंत्याकडून करुन घेणे सोईस्कर आहे.

ही बाब लक्षात घेता कोणत्याही कनिष्ठ अभियंत्यांच्या बदल्या आर्थिक वर्ष संपेपर्यंत करण्यात येवू नयेत. स्थायी समितीने यापूर्वी ठरावाव्दारे बदल्यांना दिलेली स्थगितीची मुदत आर्थिक वर्ष संपेपर्यंत कायम ठेवण्यास मान्यता द्यावी.

विषय क्रमांक :– ११५४ त्वर्य

मा.सौ.निलीमा खाडे व मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१४ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १)१२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३२,अ.क्र.१९९, प्रभाग क्र.१४ ब, मध्ये वडारवाडी येथे विविध ठिकाणी सुशोभिकरण करणे २) १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४४, अ.क्र.६६, प्रभाग क्र. १४ ब मध्ये वडारवाडी येथे जिमचे साहित्य पुरविणे	१० लाख १० लाख	--- ---
नवीन सुचविलेली कामे–		
१)प्रभाग क्र.१४ ब मध्ये गुडलक चौक येथे डिजिटल कर्व्ह स्टोन बसविणे	---	१० लाख
२) प्रभाग क्र.१४ ब मध्ये मॉडेल कॉलनी येथे डिजिटल कर्व्ह स्टोन बसविणे	---	१० लाख

विषय क्रमांक :– ११५५ त्वर्य

मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३४ क मध्ये नागरिकांकरिता ॲमेनिटी स्पेसवर प्लेस मेकिंग प्रकल्प राबविणेसाठी र.रू.७० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), १) पान क्र. २५६, अ.क्र.१६२, प्रभाग क्र.३४ क मध्ये सनसिटी रोड परिसरात बाल उद्यान व थिम पार्क करणे २) पान क्र. २५६, अ.क्र.१६५, प्रभाग क्र.३४ क मध्ये ताब्यात आलेल्या ॲमेनिटी स्पेसवर उद्यान विकसित करणे	३० लाख ४० लाख	--- ---
नवीन सुचविलेले काम		
प्रभाग क्र.३४ क मध्ये नागरिकांकरिता ॲमेनिटी स्पेसवर प्लेस मेकिंग प्रकल्प राबविणे	---	७० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.